**नियमित दिवाणी मुकदमा नं.४४८/२०२३ – निशाणी १८ लगत आदेश**

उत्तम बिरा पाटील वि. जयवंत पांडूरंग पाटील इ.

CNR No. MHSO20–001715–2023

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ तर्फे दाव्यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी केलेला आहे. सदर प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस मानाने वाटप होवून मिळणेचा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ यांना वाद मिळकतीसंबंधीचे आवश्यक असणारी जुनी कागदपत्रे मुदतीत मिळाली नाहीत तसेच यातील प्रतिवादी क्र.२ याचे माहितगार वकील श्री. के.बी. धारुरकर यांचे किडणी स्टोनचे ऑपरेशन झालेले होते. त्याकाळात प्रतिवादीचे वकीलांना पोटातील इन्फेक्शन झालेने Hypoglycaemia या व्याधीचा त्रास होवू लागला व त्याबाबत उपचार सुरू केले. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांना मे. कोर्टात हजर राहुन वादीचे दाव्यास कैफियत मुदतीत देणे अशकय झाले. कैफियत देणेसाठी १ वर्षे ३६ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ होवून सोबत दाखल केलेली कैफियत स्वीकारणेची व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे मांडले की, अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा, बनावट व लबाडीचा असुन वादीस मान्य व कबुल नाही. अर्जातील विलंबाचे कारण खोटे व बनावट आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. वादी, प्रतिवादी क्र.२ तर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस मानाने वाटप होवून मिळणेचा दाखल केलेला आहे. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर प्रतिवादी क्र.२ यांनी मुदतीमध्ये कैफियत दिलेले नाही ही बाब स्पष्ट आहे. परंतु सदरचा

अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही. परंतु विलंबाचा कालावधी लक्षात घेता खर्च सदर प्रतिवादी क्र.२ यांचेवर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**आ दे श**

१. प्रतिवादी क्र.२ यांचा अर्ज (नि.क्र.१८) प्रतिवादी क्र.२ यांनी वादी यांना रक्कम रु.१,०००/– (एक हजार रुपये) देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.२ यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

POTDAR BHAGYASHRI MADHUKAR

Digitally signed by POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Date: 2025.02.05 13:50:57 +0530

दिनांक – ०४/०२/२०२५

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.

**<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.४४८/२०२३ – निशाणी २० लगत आदेश</u>**

उत्तम बिरा पाटील वि. जयवंत पांडूरंग पाटील इ.

CNR No. MHSO20-001715-2023

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस मानाने वाटप होवून मिळणेचा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ यांना वाद मिळकतीसंबंधीचे आवश्यक असणारी जुनी कागदपत्रे मुदतीत मिळाली नाहीत तसेच यातील प्रतिवादी क्र.२ याचे माहितगार वकील श्री. के.बी. धारुरकर यांचे किडणी स्टोनचे ऑपरेशन झालेले होते. त्याकाळात प्रतिवादीचे वकीलांना पोटातील इन्फेक्शन झालेने Hypoglycaemia या व्याधीचा त्रास होवू लागला व त्याबाबत उपचार सुरू केले. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांना मे. कोर्टात हजर राहुन वादीचे दाव्यास  कैफियत मुदतीत देणे अशकय झाले. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र.२ चे विरुध्द विना कैफियतचा आदेश झालेला आहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीसंबंधीचे असल्यामुळे या दाव्याचा गुणानुरूप न्यायनिर्णय होणेचे दृष्टीने प्रतिवादी नंबर २ यांचे विरुध्द झालेला विना कैफियतीचा हुकूम रद्द करून प्रतिवादी २ यांनी सोबत दिलेली कैफियत स्वीकारण्याची विनंती केली.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे मांडले की, अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा, बनावट व लबाडीचा असुन वादीस मान्य व कबुल नाही. अर्जातील विलंबाचे कारण खोटे व बनावट आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही पक्षातर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता सदर प्रतिवादी क्र.२ यांनी मुदतीमध्ये दाव्यास कैफियत दिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द 'विना कैफियत' आदेश झालेला आहे. वादी,

प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादी यांचे नुकसान होणार नाही. विलंबाचे कारण लक्षात घेता सदर प्रतिवादी यांचेवर खर्च ठेवणे उचित होणार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## आ दे श

१. प्रतिवादी क्र.२ यांचा अर्ज (नि.क्र.२०) मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.२ यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द करण्यात येतो.

POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Digitally signed by POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Date: 2025.02.05 13:51:07 +0530

दिनांक – ०४/०२/२०२५

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 05/02/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 05/02/2025 |